आर.सी.सी. क्र.४१८/२०२२

नि.क्र.५२

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव— गणेश निवृत्ती डहाळे

वय — ५१ वर्षे,

नेमणूक – सहायक फौजदार, पारनेर पो.स्टे.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.ए. पटेकर यांचेमार्फत</u>**–

मी पारनेर पोलीस स्टेशन येथे सन २०२१ पासून ते आजपावेतो कार्यरत असून दि.०७/०९/२०२२ रोजी मी पारनेर पोलीस स्टेशनला सहायक फौजदार म्हणून नेमणुकीस असताना माझ्याकडे गु.र. नंबर ७१८/२०२२ चा तपास माझ्याकडे तोंडी आदेशान्वये आला. फिर्याद, सीसीटीएनएस, दैनिक अहवाल मला प्राप्त झाले. पहिले मी दोन पंचासमक्ष फिर्यादीचे राहते घर वाकन मळा वडनेर येथे दि.०८/०९/२०२२ रोजी सकाळी ९ ते ९.४५ वाजेपर्यंत फिर्यादीने सांगितलेल्या हकीगतीप्रमाणे पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला असता त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यास **निशाणी ५३** देण्यात येते. त्यानंतर मी साक्षीदारांचे जवाब घेतले. त्यानंतर फिर्यादीचा कलम १६४ खालील जवाब नोंदविणेकामी कोर्टास पात्र पाठविले. आता मला ते पत्र दाखवण्यात आले असता त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर माझी व पो.नि. साहेबांची सही असून त्यास निशाणी ५४ देण्यात येते. कलम १६४ खालील जवाब गुन्ह्याच्या कागदपत्रात मी सामील केला. आरोपी मयूर बाबर याने विनयभंग केल्याचे व आरोपी हनुमंत बाबर याने शिवीगाळ केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी हनुमंत बाबर आजरोजी न्यायालयात हजर असून मयूर बाबर यास दाखवल्यास मी ओळखू शकतो.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. एम.एल.औटी यांच्यामार्फतः</u>**

दि.०७/०९/२०२२ रोजी मी निघोज दूरक्षेत्रावर कर्तव्यावर होतो व माझी नेमणूक पारनेर पो.स्टे.ला होती. त्यावेळी ठाणे अंमलदार लोणारी होते. ते सद्या नौकरीत

आहे. वडनेर बुद्रुक आमच्या आउटपोस्टच्या कार्यक्षेत्रात आहे व निघोज पासून ते गाव ७ कि.मी. आहे. निघोज आउटपोस्ट विरुद्ध पारदर्शकपणे काम करत नसल्याबाबत तक्रारी नव्हत्या. कोर्टाकडे एफआयआर पाठवले की नाही याचे काम ठाणे अंमलदाराचे असते, त्याबाबत मी चौकशी केली नाही.

प्रश्न – फिर्याद दाखल करताना ५–६ तास वेळ लागतो का?

उत्तर – काही टेक्निकल इशू असेल तर तेवढा वेळ लागतो.

प्रश्न – दिनांक ०७/०९/२०२२ रोजी सकाळी ११ ते ४ वाजता पोलीस स्टेशनला काही टेक्निकल प्रॉब्लेम होता का?

उत्तर – ते ठाणे अंमलदार लोणारी सांगू शकतील. हे मी सांगू शकत नाही.

प्रश्न – त्यादिवशी किती फिर्याद दाखल झाल्या?

उत्तर – ते ठाणे अंमलदार लोणारी सांगू शकतात.

प्रश्न – फिर्याद दाखल करताना उशीर का झाला याचा उल्लेख दोषारोपपत्रात नाही याचे कारण सांगता येईल का?

उत्तर – कारण तो तपासाचा भाग नाही.

फिर्यादीच्या घरासमोर ४–५ घरे आहेत. फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे २–३ घरे आहेत. घटनास्थळी मला गोठा दिसल्याचे आता आठवत नाही. घटनस्थळी असलेल्या दोन खोल्यांचे मोजमाप मी केले नाही. खोल्यांच्या खिडक्यांचे मोजमाप मी केले नाही. साक्षीदार खंडेराव याचे घर फिर्यादीच्या घराच्या पाठीमागे आहे. त्याचे घर व आरोपी आणि फिर्यादीच्या घरातील अंतर मी मोजले नाही पण ते १५–२० फूट अंतर आहे. खंडेराव च्या घरापुढे ओटा आहे तो ओटा आरोपी व फिर्यादीच्या घराला लागून आहे का हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामामधील नकाशामध्ये मी ओटा दाखवलेला नाही. आरोपींच्या खोल्यासमोर जे ४–५ घरे आहेत त्या लोकांचे मी जवाब घेतले आहे. माझ्याकडे आलेली फिर्याद व फिर्यादीच्या जवाबत फिर्यादी ही शिकलेली असल्याने आणि सुंदर असल्याने आरोपी तिचा राग करत होते असे त्यामध्ये नमूद नाही. फिर्यादमध्ये सासरे हनुमंत बाबर याने फिर्यादीचा हात धरून तिला घराबाहेर काढले असे

फिर्यादमध्ये नमूद नाही. फिर्यादमध्ये फिर्यादीने तिचे लग्न झाल्यावर तिचे सासू–सासरे तिच्यावर संशय घेत असल्याचे फिर्यादीत नमूद नाही.

प्रश्न – खंडूने घटना कुठून पहिली?

उत्तर – घराच्या पाठीमागून असेलल्या खिडकीतून पहिली.

प्रश्न – खंडू ओट्यावर बसला असताना त्याला घरातील संपूर्ण भाग दिसू शकेल का?

उत्तर – नाही.

प्रश्न – तुमच्या निष्कर्षपर्यंत येण्यासाठी आरोपी मयूरने फिर्यादीची छाती दाबून तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचे तुम्ही कोणाच्या जवाबच्या आधारे सांगत आहेत?

ऊत्तर – खंडेराव बाबर, शरद बाबर आणि फिर्यादी यांच्या जवाबावरून मी त्या निष्कर्षापर्यंत आलो आहे.

हे म्हणणे खरे नाही की, मी सगळ्या साक्षीदारांचे जवाब तसेच कॉपी पेस्ट करून त्यामध्ये फक्त त्यांचे नावे टाकले. केसचा तपास करताना त्याची पार्श्वभूमी तपासावी लागते. त्यांच्यामध्ये शेतीचा वाद आहे का किंवा इतर वाद आहे का याची चौकशी करावी लागते. सदर प्रकरणात आरोपी व फिर्यादीमध्ये पूर्वी काय वाद आहेत याची चौकशी मी केली नाही. वडिलांनी भावाभावांमध्ये शेतजमिनी काही वाटून दिल्या होत्या का याबाबत मी चौकशी केली नाही.

प्रश्न – फिर्यादी व आरोपी यांच्यामधील पूर्वी केसबाबत काही कागदपत्रे दाखल केली आहेत का?

उत्तर – क्रॉस फिर्याद दाखल आहे मात्र त्याचे कागदपत्र दाखल केले नाही.

क्रॉस फिर्यादचे दोषारोपपत्र दाखल आहे. दोषारोपपत्र उत्तम बाबर यांच्याविरोधात दाखल केले आहे. घटनेच्या दिवशी पाऊस होता का हे आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयूरने फिर्यादीचा विनयभंग केलेला नाही व हनुमंत यांनी फिर्यादीस शिवीगाळ केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी व उत्तम बाबर यांच्या सांगण्यावरून मी खोटा तपास केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खंडू व शरद बाबर यांनी

माझ्यासमोरील जवाबात मयूरने फिर्यादीस छातीला हात लावल्याबाबत सांगितलेले नाही.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(डॉ.एन.एस.सबनीस)

दिनांकः ०९/०१/२०२६.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.